# राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांची शैक्षणिक चळवळ

**श्रीमती मीना अनिल जाधव** सहयोगी प्राध्यापक समाजशास्त्र विभाग, म.ह. शिंदे महाविद्यालय तिसंगी
E-Mail :meenasawant60,@gmail.com

**सारांश**

जगातील काही देश सामर्थ्यशाली व बलवान झाले आहेत ते केवळ वैज्ञानिक दृष्टिकोनावर आधारित शैक्षणिक प्रगतीमुळे. परंतु भारतात आजही काही विशिष्ट समाजाची मक्तेदारी असलेली दिसते. विषमता, जातीभेद याचा प्रभाव सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक या सर्व क्षेत्रावर असलेला दिसतो. स्वातंत्र्याच्या 75 वर्षानंतरही आपल्या देशात संपूर्ण सामाजिक समता प्रस्थापित होऊ शकली नाही. परंतु स्वातंत्र्यपूर्व काळात शंभर वर्षापूर्वी कोल्हापूर संस्थान मध्ये राजर्षि शाहू महाराजांसारख्या द्रष्टया राजाने क्रांतिकारक अशी शैक्षणिक चळवळ उभी केली. शिक्षण हा सर्व सुधारणांचा पाया आहे याची जाणीव ठेवून त्यांनी आपल्या संस्थानातीलच नाही तर संपूर्ण भारतामध्ये शिक्षणाची गरज ओळखून शैक्षणिक चळवळ उभी केली. सर्वांसाठी शिक्षण ही गरज ओळखताना शेतकरी, सैनिक, मजूर, गृहिणी याशिवाय अस्पृश्य, मागासलेले, भटके यांनाही शिक्षण मिळाले पाहिजे तरच ते सुखी व समर्थ होतील. त्याबरोबर समाजही उन्नतीच्या दिशेने वाटचाल करेल. या विचारानेच शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंतच्या सोयी सवलतींवर भर दिला. आजच्या काळातही हे त्यांचे शैक्षणिक कार्य संपूर्ण समाजात शैक्षणिक क्रांतीच घडवून आणणारे आहे असे मानावे लागेल.

की वर्ड : राजर्षि शाहू महाराज, शैक्षणिक चळवळ, शैक्षणिक दृष्टिकोन, शैक्षणिक उपक्रम.

**प्रस्तावना :**

विसाव्या शतकाच्या सुरूवातीस महाराष्ट्र मध्ये सुरू झालेल्या परिवर्तन चळवळीस चालना देण्याचे काम कोल्हापूरचे राजे छत्रपती शाहू महाराज यांनी केले. ज्या काळात फक्त ब्राम्हणांना शिकण्याचा अधिकार होता, ज्यांना शिक्षणाचा हक्क नाकारला होता, अशा समाज विभागामध्ये शिक्षणाचा पाया शाहू महाराजांनी घातला. 1947 ला देश स्वतंत्र झाला. 1950 ला घटना अंमलात आणली गेली. या घटनेच्या 45 व्या कलमान्वये 14 वर्षापर्यंतच्या मुलामुलींना सक्तीचे व मोफत शिक्षण देण्यात आले. आज शासनाच्या धरसोडीच्या भूमिकेमुळे खेडयापाडयातील, वाडयावस्त्यांवरील तळागाळातील, मागासलेल्या समाजातील शाळा पटसंख्येअभावी बंद करण्याचे धोरण राबवले जात आहे, अशावेळी शतकापूर्वी या रयतेच्या राजाने त्या काळात केलेला मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या कायद्याचे महत्व अनन्यसाधारण असल्याचे लक्षात येते. म्हणूनच प्रस्तुत शोधनिबंधामध्ये राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांचे शिक्षणाविषयीचे योगदान अभ्यासणार आहोत.

**उद्दिष्टे :**

1. शाहू महाराजांचा शिक्षणविषयक चळवळी मागील दृष्टिकोन अभ्यासणे.
2. शाहू महाराजांच्या विविध शिक्षण विषयक उपक्रमांमागील दृष्टिकोन जाणून घेणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोध निबंधाच्या माहिती संकलनाकरिता संदर्भ पुस्तके, ग्रंथ या दुय्यम स्त्रोतांचा आधार घेण्यात आला आहे. संकलित केलेल्या माहितीचे शोधनिबंधाच्या उद्दिष्टाप्रमाणे वर्णनात्मक आणि स्पष्टीकरणात्मक पध्दतीने विश्लेषण करण्यात आले आहे.

**शाहू पूर्व काळातील शैक्षणिक परिस्थिती :**

भारतामध्ये ब्रिटीशांच्या आगमनापूर्वी सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक व शैक्षणिक क्षेत्रावर मूठभर उच्चवर्णीयांचे वर्चस्व होते. समाजावरील आपली पकड कायम रहावी या विचाराने उच्चवर्णीयांनी बहुजन समाज विशेषतः शुद्रांना शिक्षणापासून वंचित ठेवले. अज्ञान, अंधश्रध्दा, दारिद्रय यामुळे हा समाज दैववादी बनला होता. परंतु खऱ्या अर्थाने शैक्षणिक परिवर्तन 1818 मध्ये इंग्रज भारतात सत्तेवर आले, त्यानंतर त्यांनी केलेल्या शैक्षणिक सुधारणेनंतर झाले. 19 व्या शतकामध्ये भारतात शैक्षणिक चळवळ सुरू होण्यामागे या शिक्षणाचा महत्वपूर्ण वाटा होता. भारतीय समाजसुधारक समाजाच्या वेगवेगळया क्षेत्रांमध्ये समाज सुधारण्याचे कार्य करू लागले. तेव्हा म.जोतीराव फुलेंनी मर्यादित लोकांसाठी असणारे शिक्षण समाजातील सर्व स्तरापर्यंत पोहोचावे यासाठी प्रयत्न केले. स्त्रियांना शिक्षण दिले पाहिजे या हेतूने महात्मा फुले यांच्या धर्मपत्नी सावित्रीबाई फुले यांनी अपार प्रयत्न केले. भारतीय जनजीवन सुधारू शकले नाही. स्त्री आणि अस्पृश्य यांच्या शिक्षणाकडे पूर्णतः दुर्लक्ष झाले. त्यांचा शिक्षणावरचा अधिकारच मान्य केला नाही. त्याकाळी कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृशुध्दाराचे, सयाजीराव गायकवाड यांनी बहुजनांच्या शिक्षणासाठी कार्य केले. तसेच महात्मा फुले यांनी शिक्षणाच्या माध्यमातून समतेची मशाल पेटवली. याच काळात शाहू महाराजांनी आपला देश, आपला समाज यांची सर्वांगीण उन्नती व्हावी, परंपरागत समाजाची चौकट उध्दवस्त करून शोषित, वंचित, उपेक्षित, परिघाबाहेरील समाजाला प्रवाहात आणण्यासाठी कोल्हापूर संस्थानमध्ये शैक्षणिक चळवळ उभी केली. महात्मा फुलेंचा शैक्ष्णिक वारसा पुढे चालविणारे, सामाजिक परिवर्तनाचे महत्वपूर्ण कार्य करणारे, स्वातंत्र्यपूर्व काळात बहुजनह समाजाच्या उंबरठयापर्यंत शिक्षण गंगा पोहोचविणारे शाहू महाराज हे खरे राजे होते.

**शाहू महाराजांच्या शिक्षणविषयक चळवळी मागील दृष्टिकोन :**

"मागासलेल्या लोकांना चेतना देऊन त्यांच्यामध्ये प्राथमिक व उच्च शिक्षण घेण्यास प्रेरणा निर्मिली पाहिजे व शिक्षण घेण्यास त्यांना उद्युक्त केले पाहिजे हा तर आमच्या चळवळीचा प्रधान हेतू आहे" असे विचार शाहूराजांनी व्यक्त केले होते. याशिवाय शिक्षणानेच तरणोपाय आहे असे त्यांचे ठाम मत होते. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती होत नाही. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये वीर कधीही निपजणार नाहीत म्हणून सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदुस्तानला अत्यंत आवश्यकता आहे. शाहू

महाराजांचा शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टिकोन केवळ आपल्या संस्थानपुरता मर्यादित नव्हता तर पूर्ण हिंदुस्थानाची उन्नती, विकास व्हावा हा व्यापक हेतू त्यामागे दिसून येतो.

**1. सर्वांगीण विकासाची दृष्टि :**

संपूर्ण समाजाचा विकास व्हावा, व्यापक समाज हित साधावे, केवळ मूठभरांना शिक्षण दिल्याशिवाय समाजाची सर्वांगीण प्रगती होणार नाही. अज्ञानात बुडालेला देश अथवा समाज स्वतःबरोबरच बहुजनांना अज्ञान, अंधश्रध्देच्या खाईत घेऊन जातो. शिक्षणात केलेली गुंतवणूक पुढील अनेक पिढयांचचं भवितव्य उजळवणारी, माणूस म्हणून जगण्यासाठी प्रेरणा देणारी असते. ती बहुजन समाजाच्या कित्येक पिढयांचा उध्दार करणारी आहे असा विचार शाहू महाराजांचा होता. माणसाकडे उपजत असणारे सामर्थ्य व वैशिष्टयपूर्ण कौशल्य याला शिक्षणाची जोड गरजेची आहे. समाजातील कोणताही घटक शिक्षणापासून वंचित राहू नये अशी त्यांची धारणा होती. शिक्षणाच्या माध्यमातून मानवी भवितव्यात गुंतवणूक करताना शाहू महाराजांनी फायदा तोटयाचा विचार केला नाही. कारण आज केलेली ही गुंतवणूक पुढील कित्येक पिढयांचा उध्दार करणारी ठरेल याची त्यांना खात्री होती. शिक्षणामुळे माणूस गुलामगिरी मानसिकतेतून बाहेर पडतो. आपल्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराची त्याला जाणीव होते व त्याविरूध्द लढण्याची ताकद ही शिक्षणामुळेच मिळते. माणूस म्हणून आपलेही काही हक्क आहेत, प्रतिष्ठा आहेत हे समजते. शिक्षण माणसाला आत्मबळ, आत्मप्रतिष्ठा देते आणि माणसांचे सर्वांगीण सक्षमीकरणही शिक्षणामुळेच होत असते. याची जाणीव शाहू महाराजांना होती. म्हणूनच त्यांनी प्राथमिक शिक्षणापासून तांत्रिक शिक्षणापर्यंत केलेली सोय व त्यामध्ये केलेली गुंतवणूक संपूर्ण समाजाला विकास प्रक्रियेत आणणारी व्यापक समाज हित साधणारी होती.

**2. शिक्षणाच्या माध्यमातून आत्मप्रतिष्ठा जागृत करून गुलामगिरीच्या मानसिकतेतून बाहेर काढणे :**

शिक्षणातूनच आत्मबळ, आत्मप्रतिष्ठा प्राप्त होत असल्याने अज्ञानी, अशिक्षित लोकांना पहिल्यांदा शिक्षण दिले पाहिजे. या देशात संपूर्ण स्वातंत्र्याचा उपभोग घ्यायचा असेल तर आधी सामाजिक स्वातंत्र्य व समता निर्माण केली पाहिजे. समाजातले थोडे लोक शिक्षित असतील तर त्यांच्याच हातात सत्ता व अधिकार एकवटतात. साहजिकच ते दुबळया, अज्ञानी लोकांचा गैरफायदा घेऊन त्यांना गुलामगिरीत ढकलतात याची जाणीव शाहू महाराजांना होती. म्हणूनच सर्वच लोकांना थोडयाफार प्रमाणात प्राथमिक शिक्षणाचे धडे दिले पाहिजेत याबद्दल ते ठाम होते. प्रजा जर शिक्षित असेल तर त्यांना स्वराज्य देता येईल, ती केवळ कर देण्याचे काम करणार नाही तर राज्यकारभार करून खर्चाचे नियोजन कसे करावे याचे ज्ञानही त्यांना होईल. शिक्षणाअभावी निर्माण होणारी मानसिक गुलामगिरी दूर करायची असेल तर थोडयाच लोकांना पूर्ण शिक्षित करण्यापेक्षा सर्वच लोकांना अंशतः शिक्षण मिळाले पाहिजे हा दृष्टिकोन शाहू महाराजांनी बाळगला.

**3. समाज सुधारणेस चालना देणे :**

शाहू महाराजांच्या काळात सावकार व पुरोहित वर्गाची चलती होती. ते शेतकऱ्यांना लुबाडत, त्यांच्या जमिनी बळकावत. केवळ अज्ञानामुळे या वर्गाची गळचेपी झालेली दिसून येत होती. अज्ञान, अंधश्रध्दा, धार्मिकतेच्या श्रृंखलेत जखडलेला समाज सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व धार्मिकदृष्टया वर्चस्वाखाली जगत होता. समाजातील ही विषमता दूर करायची असेल , खालच्या पायरीवरून ब्राम्हणेतर वर्गाला वर घ्यायचे असेल तर त्यांना शिक्षण दिले पाहिजे, त्यांना ज्ञानी बनवले पाहिजे या दृष्टिकोनातून शाहू महाराजांनी बहुजनांच्या शिक्षणाला प्राधान्य दिले व समाज सुधारणेला चालना दिली. शिक्षणामुळेच समाजातील अज्ञान, अंधश्रध्दा दूर होऊन समाज विकसित होईल.

**4. सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी अस्पृश्य व बहुजनांना शिक्षण देण्याविषयीचा दृष्टिकोन :**

शाहू महाराजांना जाणीव होती की, गतकाळात एकाच जातीची मक्तेदारी शिक्षण व्यवस्थेवर होती. मनुस्मृती व शास्त्रकारांच्या प्रभावाखाली असणारी शिक्षणव्यवस्था म्हणजे एक अंधार युग होतं. निरनिराळया जातीवर अत्यंत काटेकोर निर्बंध होते. त्यांचचं मागासलेपण सर्व क्षेत्रात ठळकपणे दिसून येत होतं. म्हणूनच शाहू महाराजांनी त्यांचचं मागासलेपण दूर करायचे असेल तर अस्पृश्य व बहुजनांना शिक्षणाच्या प्रवाहात आणलं पाहिजे या हेतूनेच त्यांच्या शिक्षणाकडे प्राधान्याने लक्ष दिले. कायदे करून व आदेश देऊन भागणार नाही तर त्यासाठी सोयी सवलती देऊन त्यांना शिक्षणाकडे आकर्षित केलं पाहिजे. यासाठी त्यांनी सर्वतोपरी प्रयत्न केले. केवळ शाळा काढून ते थांबले नाहीत, तर हा समाज शिक्षण प्रक्रियेत आल्यास त्यांना प्रखर विरोधाला सामोरे जावे लागेल या जाणीवेतून प्रत्येक गोष्टीवर त्यांनी कसून तोडगा काढला. सर्वच मागासलेल्या समाजाला जर पत, प्रतिष्ठा, दर्जा प्राप्त व्हायचा असेल तर त्यांना शिक्षण दिले पाहिजे हा दृष्टिकोन शाहू महाराजांचा होता. समाजातील अज्ञान, दारिद्रय, सामाजिक विषमतेविरूध्द लढण्याचे प्रभावी हत्यार म्हणून शिक्षणाकडे त्यांनी पाहिजे. बहुजन समाजाला सामर्थ्यवान बनवायचे असेल तर शिक्षण दिले पाहिजे. कारण शिक्षित लोकच सजग राहतात. चौफेर पाहतात, पारंपारिक क्षेत्र सोडून नवी क्षेत्र धुंडाळतात, प्रगतीची संधी शोधताना इतरांशी स्पर्धा करू लागतात. स्वतःबरोबरच समाजाच्या उन्नतीस हातभार लावतात या दृष्टिने शाहू महाराजांनी बहुजनांच्या सर्वंकष शिक्षणाचा पाया घातला.

**शाहू महाराजांचा शिक्षण उपक्रमांविषयीचा दृष्टिकोन :**

1. सक्तीचे व मोफत शिक्षण ब्राम्हणेतर वर्ग अज्ञानी व मागासलेला आहे. त्यांच्याकडे अधिक लक्ष देऊन शिक्षण प्रसार केला पाहिजे या विचाराने महात्मा फुले यांनी कार्य केले. हाच विचार समोर ठेवून शाहू महारजांनी महात्मा फुलेंचे स्वप्न पूर्ण करण्याच्या हेतूने 1913 ला मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा केला. शाहू महाराजांना बहुजन व खालच्या वर्गातील लोकांविषयी केवळ सहानुभूती नव्हती तर हा शोषीत घटक जागृत झाला पाहिजे, शिकला पाहिजे या विचारातून त्यांनी सर्वांना शाळेचे दरवाजे खुले केले. शिक्षण सक्तीचे करून दुर्बल घटकांच्या बुध्दी व ज्ञानाच्या वापरावर लावलेले निर्बंध झुगारून देण्याची शक्ती त्यांच्या ठायी यावी यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. त्याचा फायदा याच पिढीला नाही तर पुढच्या पिढीला होईल हा विचार त्यामागे होता. प्राथमिक शिक्षण हे पायाभूत शिक्षण आहे. त्यामुळे इच्छा असो वा नसो, ते सक्तीने दिले पाहिजे या तळमळीमागे शाहू महाराजांना विद्येची मक्तेदारी संपवून संपूर्ण समाज समर्थपणे जगण्यातला

लायक बनवायचा होता हा विचार दिसून येतो. जातीच्या आधारावर भेदभाव न करता सर्व जातीच्या मुलांना एकत्र शिक्षण देण्याच्या त्यांच्या विचारातून मानवतावाद स्पष्ट होतो.

**2. गाव तेथे शाळा :**

शाहू महाराजांना सामाजिक समता प्रस्थापित करायची होती. त्यासाठी सर्व सामान्यांना शिक्षण देऊन त्यांच्यातील साचलेपणा, धर्मभोळेपणा नष्ट करून त्यांना मुख्य प्रवाहात आणायचे होते. त्याविषयी आपला दृष्टिकोन स्पष्ट करताना त्यांनी म्हटले की, देशाची नैतिक किंवा ऐहिक उन्नती साधण्यासाठी सर्वात मोठी गरज म्हणजे चांगले शिक्षण त्याचा सर्वत्र प्रसार झाला पाहिजे. या विषयाने शाहू महाराजांनी गाव तिथे शाळा ही मोहीम सुरु केली. स्थितीशील समाजात परिवर्तन घडवायचे असेल तर लोकांची मने शिक्षणासाठी तयार करणे, पुढारी लोकांना त्याचे महत्व पटवणे आवश्यक आहे याची त्यांना जाणीव होती. शिक्षण समाजाच्या खालच्या स्तरापर्यंत पोहोचवायचे असेल तर खेडयापाडयांमध्ये शाळा सुरू केल्या पाहिजेत हा महात्मा फुलेंचा विचार त्यांनी आपल्या संस्थानात पुढे नेला. त्यासाठी वर्णव्यवस्थेवर आधारित हिंदू धर्माची पक्की चौकट खिळखिळी केल्याशिवाय प्रत्येक गावातील सर्व जाती बांधवांना शिक्षण मिळणार नाही व त्यांचे उत्थानही होणार नाही हा क्रांतिकारक विचार त्यामागे होता. शाहू महाराजांनी उच्च–नीच हा भेदभाव न करता सर्व जातींच्या विद्यार्थ्यांनी एकत्र सरकारी शाळेत बसवले. गावापासून अलग असलेल्या फासेपारध्यांच्या झोपडीपर्यंत शिक्षण पोहोचवले. गावागावात, वाडया–वस्त्यांवर शिक्षण पोहोचले तर ज्ञानप्रसाार होईल. ज्ञानी समाजच परिवर्तन घडवून आणू शकतो हा त्या मागील हेतू स्पष्ट होतो.

**3. शिष्यवृत्ती व पारितोषिके :**

पद दलित, गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणामध्ये अडथळा येऊ नये, त्यांच्यामध्ये शिक्षणाविषयी आस्था निर्माण व्हावी या हेतूने शाहू महाराजांनी गरीब मागासलेल्या समाजाला शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, पारितोषिके व नादाऱ्या दिल्या. तलाठी शिक्षण घेणाऱ्या अस्पृश्य जातीच्या विद्यार्थ्यांना दरमहा शिष्यवृत्ती मंजूर केली. चौथी इयत्ता पास होणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणास प्रोत्साहन मिळावे म्हणून तीन रूपये शिष्यवृत्ती जाहीर केली. राजाराम महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींची संपूर्ण फी माफी केली. तसेच चौथ्या इयत्तेत सर्वात वर येणाऱ्या दोन मुलींना स्कॉलरशिप जाहीर केली. त्यातून स्त्रियांच्या शिक्षणालाही उत्तेजन देण्याचा त्यांचा दृष्टिकोन दिसून येतो. कोरवी, वडूर तसेच डिप्रेस्ड क्लासेसच्या सर्व विद्यार्थ्यांना शाळेत येण्याची इच्छा आहे, पण फी देण्याचे सामर्थ्य नाही अशांना ही माफीचा त्यांनी जाहीरनामा काढला. त्यातून शिक्षण प्रसाराकडे पाहण्याचा त्यांचा मानवतावादी दृष्टिकोन स्पष्ट होतो. एवढेच नव्हे तर बहुजन समाजातील बुध्दिमान मुलांना उच्च शिक्षण मिळावे, परदेशातील शिक्षणाची संधी मिळावी यासाठी शिष्यवृत्तीची तरतूद केली, त्यातून शाहू महाराजांचा सर्व स्तरातील शिक्षण विना अडथळा बहुजनांना मिळावे हा दृष्टिकोन दिसून येतो.

**4. शिक्षणाचा आधारस्तंभ वसतिगृह :**

शाहू महाराजांनी गावागावात प्राथमिक शाळा काढल्या. पण ग्रामीण भागातील हुशार गरीब मुलांना दुय्यम आणि उच्च शिक्षणाची सुविधा नव्हती. त्यांच्या पुढील शिक्षणात अडथळा येऊ नये यासाठी दूरदृष्टीने शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानमध्ये वसतीगृहाची मोठी चळवळच उभी केली. सुरूवातीला कोणताही भेदभाव न करता सर्व जातीच्या मुलांना कोल्हापूर येथे एकत्र ठेवले. पण त्यामध्ये ब्राम्हण विद्यार्थ्यांची सोय होऊ लागली. बहुजनांच्या शिक्षणात अडथळे येऊ लागले. ब्राम्हणांनी शिक्षणातील मक्तेदारी मोडून काढून पिढयानपिढया मागासलेल्या समाजामध्ये स्वाभिमान जागृत करण्याच्या हेतूने त्यांनी सर्व जाती जमातीच्या मुलांसाठी स्वतंत्र वसतिगृहे निर्माण केली. याबाबत त्यांच्यावर टीका झाली. परंतु त्यांना वसतिगृहांच्या माध्यमातून शिक्षणविषयक जागृती निर्माण करायची होती. उच्च व दुय्यम शिक्षणास प्राधान्य द्यायचे होते. शिक्षणाची द्वारे सर्वांना मोकळी झाली पाहिजे, विद्यार्थ्यांमध्ये जातीभेदाची भावना कमी करून त्यांच्यामध्ये स्वावलंबन, सहिष्णुता, शिस्त, देशप्रेम इत्यादी गुण वाढीस लावायचे होते. या दृष्टिकोनातून शाहू महाराजांनी त्या त्या जातीच्या पुढाऱ्यांना एकत्र करून स्वजातीचा उध्दार करा असा संदेश दिला. जातीय अस्मिता जागृत करून त्यांच्यातील सर्व जातींना सर्व क्षेत्राात पुढे येण्याची संधी शाहू महाराजांना द्यायची होती, म्हणूनच जातवार वसतिगृहांचा त्यांनी पाया घातला.

**5. शिक्षण कर :**

शाहू महाराजांनी बहुजनांना शिक्षण देऊन ज्ञानी करण्याचा यज्ञ अखंड चालू केला. शाळा काढणे, त्यासाठी इमारत, शिक्षक, इतर साहित्य यांची सोय करायची तर पैसा हवा. याबाबतही शाहू महाराजांच्या दूरदृष्टीचा प्रत्यय येतो. त्यांनी शिक्षण कराचा कायदा केला. शंभर रूपयाहून अधिक उत्पन्न असणाऱ्या लोकांवर शिक्षण कर बसविला. मोठया गावांमध्ये घरटी – आठ आणे व एक रूपया वार्षिक शिक्षण कर आकारला. दुर्बल उपेक्षित अज्ञानी लोकांच्या उन्नतीसाठी प्रयत्न करणे वरिष्ठ वर्गाचे कर्तव्य आहे. गरीबांच्या प्रगतीसाठी श्रीमंतांनी आपला अल्प मोबदला दिला पाहिजे हा विचार त्यामागे होता व तो विचार त्यांनी समाजात रूजवला. शिक्षण कराचा हा हुकूम एखाद्या अर्थतज्ज्ञाला शोभेल असा होता. ज्याद्वारे त्यांनी संपूर्ण जनतेस शिक्षण चळवळीत सहभागी करून घेतले.

**6. शिक्षक प्रशिक्षण केंद्र :**

जेवढा गुणवान, चारित्र्यसंपन्न तेवढे विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार होतात. मोफत सक्तीचे शिक्षण गावागावात सुरू करून शाळा सुरू झाल्या. त्यांना शिक्षण देणारा शिक्षक हा अत्यंत महत्वाचा घटक आहे याचे गांभीर्य शाहू महाराजांनी ओळखले. त्यांच्या मते शिक्षक हा ज्ञानी, व्यासंगी अध्यापनामध्ये तज्ज्ञ असला पाहिजे. शिक्षक हा जन्मावा लागतो. तो तयार करता येत नाही. या पारंपारिक गोष्टीवर शाहू महाराजांचा अजिबात विश्वास नव्हता. शिकवणे ही एक कला आहे आणि तिला प्रशिक्षणाने धार चढू शकते या दृष्टिकोनातूनच त्यांनी शिक्षक प्रशिक्षण केंद्र सुरू केले. या उपक्रमाचा प्रधान हेतू हाच होता की, शिक्षणातून घडणाऱ्या शिक्षकांनी संस्कारीत केलेला विद्यार्थी ज्ञानी, चारित्र्यसंपन्न, ज्ञान व विज्ञान यावर विश्वास असणारा आदर्श असावा. शिक्षक ध्येयवादी असला तरी त्याच्याही गरजा असतात याचा विचार करून शाहू महाराजांनी गावागावांत शिक्षकांना वतने जमिनी देऊन त्यांची आर्थिक सोय केली. शिक्षकांच्या नेमणुका या गुणवत्तेच्या

आधारावर केल्या जात. शिक्षण क्षेत्रातल्या प्रत्येक घटकाच्या प्रश्नांकडे खोलवर जाऊन विचार करण्याच्या शाहू महाराजांच्या या दृष्टिकोनामुळेच त्या काळात शिक्षणक्रांती होण्यास मदत झाली.

**निष्कर्ष :**

कोल्हापूर संस्थानमध्ये शाहू महाराजांनी सुरू केलेल्या शैक्षणिक चळवळीमुळे संपूर्ण महाराष्ट्र शंभर वर्षांनी पुढे गेला. समाजाची जुनी कालबाहय विचारसरणी, शिक्षणातील मक्तेदारी धुडकावून जनसामान्यांना शिक्षण प्रवाहात आणले. सामाजिक विषमता जातीभेदांनी विभागलेल्या समाजाला समतेकडे जाण्याचा मार्ग दाखवला. राजर्षि शाहूंच्या प्रेरणेतून, संस्कारातून शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या अनेक विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रामध्ये अनेक शिक्षण संस्था उभ्या करून शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्याचा मार्ग प्रशस्त केला. कर्मवीर भाऊराव पाटील, भाऊसाहेब हिरे डॉक्टर पंजाबराव देशमुख, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी महाराष्ट्रात विविध भागात मोठया शिक्षण संस्था उभ्या केल्या. याशिवाय अनेक शिक्षण संस्था कोल्हापूर मध्ये प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंतच्या सोयी सुविधा निर्माण करणाऱ्या उभ्या राहिल्या व नावारूपास आल्या. शाहू महाराजांनी शैक्षणिक चळवळीचा वापर सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय, विषमता व दारिद्रय, अज्ञानाच्या लढाईतील एक प्रभावी हत्यार म्हणून केला. सामान्य माणसाच्या जीवनात शिक्षणातून सुख–समृध्दी निर्माण झाली, माणसातला माणूस जगण्यास समर्थ झाला हे शाहू महाराजांच्या शैक्षणिक चळवळीचे फलित होय.

**संदर्भ ग्रंथ :**

1. भगत रा.तु. (2016) "राजर्षि शाहू छत्रपती जीवन व शिक्षण कार्य", रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर.
2. पानसरे गोविंद (2015) "राजर्षि शाहू वसा आणि वारसा", लोकवाड.मय गृह, मुंबई.
3. फाटक न. र. (1972) "श्री शाहू छत्रपती – सामाजिक सुधारणेबाबत विचार जागृती", (व्याख्यानमाला), शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
4. संगवे विलास (2003) "राजर्षि शाहू महाराज कार्य व प्रभाव", एक्सप्रेस पब्लिशिंग हाऊस, कोल्हापूर.
5. सूर्यवंशी कृ.गो. (1992) "वादळ आणि राजर्षि शाहू", राष्ट्रीय प्रबोधिनी प्रकाशन, कोल्हापूर.
6. केशव हरेल (2015) "समाज सुधारक भाग–1", अक्षरदालन, कोल्हापूर.